Indian Streams Reserach Journal
Vol.1,Issue.X/Nov; 11pp.1-4 प्रा. डॉ. डी. एन. कळंबे ISSN:-2230-7850

Research Papers

# चोरघडे यांच्या कथानायिका

प्रा. डॉ. डी. एन. कळंबे
(एम्.ए., एम्.फिल्.,पीएच्.डी. मराठी, एम्.ए. इतिहास, बी.एड्.)
सहयोगी प्राध्यापक तथा मराठी विभागप्रमुख
विद्या विकास कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, समुद्रपूर
जि. वर्धा 442305

## प्रास्तविक

वैदर्भीय कथाकार वामनराव चारेघडे यांचा कथासंसार विस्तृत आहे. त्यांच्या कथा या कमीत शब्दात जास्त आशय व्यक्त करणाऱ्या संस्कारक्षम कथा आहेत. त्यांच्या कथांमधील नायक आणि नायिका वाचकांना अनमोल असा संदेश देऊन जातात. त्यातही नायिका या अधिक प्रभावी आणि लक्षवेधक आहेत.

चोरघडे यांची पहिली कथा 'अम्मा'. यातील नायिका वास्तव जीवनाचे सत्य मांडते. ''जिस दिन खानेको नही मिला, उस दिन उपासही है!'' या तिच्या बोलण्यात कारूण्य आहे. स्त्रीच्या जीवनातील विविध नाजूक पदर चोरघडेंनी आपल्या कथांमधून अतिशय अलगद उलगडलेले आहेत. अन्नाकरीता – कुटुंबपोषणाकरीता स्त्रीला स्वतःचे शील विकावे लागणे ही समाजासाठी अत्यंत लाजिरवाणी गोष्ट आहे. 'भाकरीची गोष्ट', 'तेवढा एक तास', 'निरूपाय' या कथांमधून वर्णन केलेली स्त्रीची अगतिकता करूण तर आहेच, पण समाजाला लांच्छनास्पद असल्याची जाणीव करून देणारी आहे. 'भाकरीची गोष्ट' मधील नायिका दोन पायल्या ज्वारी व दोन पेंड्यांच्या मोबदल्यात आपले शरीर विकते. अनेक कथांमधून स्त्रीच्या अगतिकतेचे व तिच्या होणाऱ्या विटंबनेचे जे दर्शन घडते त्यामुळे वाचक अंतर्मुख होतो.

चोरघडेंच्या कथा या हृदयाचा ठाव घेणाऱ्या आहेत. याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे, त्यांच्या कथांमध्ये त्यांनी स्त्री पात्रांना दिलेले आदराचे स्थान हे आहे. अनेक लोककथा त्यांच्या लेखणीमधून मोठ्या सहजसुंदरतेने बाहेर पडलेल्या आहेत. 'लोकगंगेतील पुण्यदीप', 'लोकसाहित्याचा निर्माता', 'लोककलेचे मूल्य' या त्यांच्या निबंधरूपी कथांमधून लोकसाहित्याची प्रेरणा व तिचे स्वरूप यांची केलेली मीमांसा मूलगामी आहे. पण त्यापेक्षा त्यांनी लिहिलेल्या लोककथा व कहाणीवजा कथा या अधिक सुंदर वाटतात. या त्यांच्या कथांमधून लोककथांचे सारे विशेष प्रगट झालेले दिसतात. त्यात काव्य आहे, उत्कटता आहे, सामाजिक आशय आहे आणि सकस भावोत्कट शैली आहे. आपला भावानुभव प्रगट करण्यासाठी लोककथा, कहाणी यांच्या माध्यमातून व्यक्त करतांना त्यांनी केवळ बाह्य अनुकरणावर भर दिला नाही तर सामाजिक व नैतिक तत्त्व त्यातून प्रभावी पद्धतीने व्यक्त करण्याचे तंत्रही त्यांनी आत्मसात केले. त्यादृष्टीने त्यांच्या 'नवी बायको', 'भाकरीची गोष्ट', 'सूनबाई', 'पुनर्जन्म', 'एक होती म्हातारी', 'कष्टाची कहाणी' इत्यादी कथा अभ्यासण्यासारख्या आहेत.

### लोककथेमधील कथानायिका : सूनबाई (मालन)

'लोककथा' या साहित्य प्रकाराच्या माध्यमातून विचार केला तर त्यांच्या 'सूनबाई', 'भाग्यवती', 'पुनर्जन्म', 'एक होती म्हातारी', 'कष्टाची भाकरी' इत्यादी कथा समोर येतात. या सर्वच कथा नकळत फार मोठा संदेश देऊन जातात. यामधील 'सूनबाई' ही लोककथा तर विलक्षण आहे. यामध्ये लेखकाचे कसब मन थक्क करणारे आहे. या कथेत चोरघडेंनी दोन फरक केलेले आहेत. एक तर, ''मूळ स्वरूपातील सूनेच्या तोंडच्या मारूतीरायाला दिलेल्या शिव्या काढून टाकल्या व सूनेला मारूतीरायाच्या चरणी डोई ठेवायला लावले.'' व दुसरे, ''तिच्याकरवी मारूतीरायाचा निरोप पाटलाला सांगितला'' लोकसाहित्याच्या समृद्धीच्या दृष्टीने ही कथा अतिशय महत्त्वाची आहे.

या कथेची नायिका 'मालन' ही वाचकांना अंतर्मुख करणारी आहे. चांगले घरदार, सासु–सासरे, दीर–जावा–नणंद अशा

भरलेल्या कुटुंबात तिचे लग्न झालेले आहे. नवतीचे चार दिवस तिचे कौतुक होते. पण लवकरच सुनेचे कौतुक पुरे होते. आता त्यांना काम हवे असते. सासूला मान पाहिजे असतो. पाटपाणी मांडण्यापासून उष्टी–खरकटी काढण्यापर्यंत सर्वच कामे तिला करावी लागतात. सर्वांचेच ऐकावे लागते. सुखवस्तु आईवडिलांच्या घरी वाढलेली ही मुलगी. परंतु इथे मात्र सगळ्यांची जेवणे झाल्यानंतरच तिच्या पोटात अन्न पडते. सासरी मालनने कित्येक दिवस भूकेपायी रडत घालविले. भूकेमुळे तिच्या डोळ्यात खळकण पाणी येई. कोपऱ्यात जाऊन ती पोटभर रडून घेई, परंतु रडण्याने काही तिचे पोट भरत नव्हते. एवढे कष्ट उपसून जेवनाची वेळ टळल्यावर दोन वाजता तिच्या पोटात अन्न पडे. ते सुग्रास असले तरी अंगी थोडेच लागणार! भूकेच्या वेळी कोंडा मिळाला तरी तो सुग्रास अन्नापेक्षा सरस असतो. परंतु ते तिच्या नशिबी नव्हते. या भुकेसाठी काय करावे ?याचा विचार करतांना कुळ, कुळाचार, गुण, मर्यादा या सर्व कडेकोट बंधनांचा विचारद तिला करावा लागत असे. भुकेला जे मिळेल,ज्या गोष्टीमुळे मिळेल ते तसे व ती गोष्ट सर्वांहून प्रिय वाटू लागते आणि तिच्याच आहारी आपण जातो. भूक शमविण्यासाठी अनेक उपाय तिने शोधले, परंतु ते सर्वच फसले. उलट मालनवर सक्त नजर ठेवण्यात आली. तिच्या कुळाचा उद्धार तर तिच्या जिव्हारी लागला. कुळावर वाईटाचा बोल आला तर मग भूकच का भागवू नये असेही तिच्या मनात आले.

***'सूनबाई' कथेमधील नायिकेचे स्थान***

'सूनबाई' ही चोरघडे यांची अतिशय गाजलेली लोककथा आहे. त्यांच्या सर्वच कथांमध्ये स्त्रीपात्रांना विशिष्ट स्थान असलेले दिसते. या कथेमधील 'सूनबाई मालन' ही तिच्या व्यक्तिरेखेतून फार मोलाचा विचारप्रर्वतक संदेश देऊन जाते. कथेच्या सुरूवातीलाच तिचा गुण नजरेस भरतो. ती सर्वांची मनोभावे सेवा करते. सर्व घरगुती कामे करून सर्वांनाच खूष ठेवण्याचा प्रयत्न करते. परंतु तिची दखल मात्र कोणीही घेत नाही. धीरगंभीर नेतृत्त्वसंपन्न नायिका ग्रामीण कथावाचकांच्या मनाचा ठाव धरून राहिल्यास नवल नाहीच. कथेतील परिस्थिती वास्तविक जीवनावर आधारित नव्हे वास्तविक जीवनातीलच असल्यामुळे कथानायिकेने सर्व विरोधांवर मात करून कथा पद्धतीने धडपड केली हे जाणूनच घेण्याची जिज्ञासा कथावाचकांच्या मनात निर्माण झाल्याशिवाय राहात नाही. चोरघडे यांनी रंगविलेली ही नायिका नेहमीसाठी मनात कोरल्या गेली आहे. त्यांनी मूळ कथेमध्ये केलेल्या थोड्याफार फरकामुळे ही कथा आणखीच परिणामकारक व संस्कारक्षम सिद्ध झालेली आहे.

***राजकीय कथांमधील एक कथानायिका : ज्योतिर्मयी***

चोरघडेंची दुसरी लक्षवेधक कथानायिका म्हणजे ज्योतिर्मयी. 1942 च्या चळवळीची पार्श्वभूमी असल्यामुळे राजकीय कथांमध्ये तिचे स्थान सर्वश्रेष्ठ मानावे लागेल. ज्योतिर्मयीचे सौंदर्य आणि तेजस्विता यामुळे ती मनात भरून राहते. सकाळच्या शुभप्रहरी विहिरीवर पाणी भरणारी नायिका पाण्याचा पहिला पोहरा फुलांच्या झाडांना, दुसरा जनावरांना, तिसरा वाटसरूंना असा तिचा दररोजचा दिनक्रम आहे. वाटसरूला पाणी पाजतांना वाटसरूची विषयासक्त नजर तिच्या क्षणात लक्षात आल्याशिवाय राहिली नाही. त्यानंतरची ज्योतिर्मयीची प्रतिक्रीया फार बोलकी आहे.

***ज्योतिर्मयी : कथानायिकेचे स्थान***

ही कथानायिका वाचकांना अंतर्मुख करणारी आहे. चोरघडेंनी मोठ्या कुशलतेने ज्योतिर्मयीचे रंगचित्र साकार केले आहे. कथेच्या सुरूवातीलाच पळसाच्या लालचटक फुलांची उपमा म्हणजे जणू क्रांतीचे प्रतिक आहे. 1942 च्या चळवळीचा संदेश त्यामुळे जास्तच प्रखरतेने वाचकांच्या हृदयात शिरतो. ज्योतिर्मयीचा आत्मविश्वास वाखाणण्यासारखा आहे. थोडीही न डगमगता, अगदी निर्भयपणे ती वाटसरूला फटकारते. वाटसरूची कोल्हयाची भेदक नजर ती क्षणात ओळखते. तिच्या वागण्यातील चोरघडेंचे कथाचित्रण अंतःकरण पिळवटून टाकणारे आहे. पुरूषी संस्कृती किंवा परंपरेला आपली चूक लक्षात आणून देणारे आहे. तिचे तेजस्वी व्यक्तिमत्त्व क्रांतीचा संदेश पोचविणाऱ्या कथानायकाला प्रभावित करते. पुरूषी वर्तणुकीबद्दल वाईट वाटते. तिला कोणत्या नावाने हाक मारावी या संभ्रमात तो तिला एकदम 'ज्योतिर्मयी' अशी हाक मारतो. नायिकेच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रत्येक पैलू मनाला प्रभावित करणारा व आल्हाद देणारा आहे. तिची निर्भयता आश्चर्यचकीत करणारी असून क्षणभरापूर्वी तिच्या तोंडून पुरूष जातीबद्दल बाहेर पडलेले उद्‌गार म्हणजे एक विदारक सत्य आहे. परंतु तरीही एका पुरूषाने दुसऱ्याच क्षणी 'ज्योतिर्मयी' म्हणून हाक मारताच ती थांबते. कथा व कथानायिकेच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रत्येक पैलू मनाला विचारप्रवृत्त व आकर्षित करणारा आहे.

***सामाजिक कथा नायिकांमधील 'अतिथी देवो भव!'ची कथानायिका : बायजा***

चोरघडेंची आणखी अतिशय गाजलेली आणि प्रसिद्ध अशी 'अतिथी देवो भव!' या कथेची कथानायिका 'बायजा' ही आहे. परंपरा सांभाळणाऱ्या स्त्रीचे अतिशय हृद्य असे चित्रण येथे आढळते. मध्यमवर्गीय शेतकरी आणि शेतमजूर स्त्रीचे प्रतिनिधित्त्व करणारी ही कथानायिका आहे.

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील बैलांच्या पोळ्याचा सण हा शेतकऱ्यासांठी अतिशय महत्त्वाचा व जिव्हाळ्याचा आहे. पोळा म्हणजे आमंत्रण देऊन आपल्या घरी बैलांना अतिथी म्हणून बोलाविण्याचा सण. त्यादिवशी बैलांकडून कोणतेही काम घ्यायचे नाही, त्यांचे काम माणसाने सांभाळायचे. कृषीदेवतेशी कृतज्ञ होण्याचा हा दिवस. कथेतील नायक पैकू व नायिका बायजा परिश्रमपूर्वक शेताची मशागत करण्यात गुतलेली आहेत. पाटलाने दिलेली आठ–दहा एकराची शेती त्यांच्यासाठी अतिशय महत्त्वाची होती. संपूर्ण हंगाम शेतीची मशागत करतांना कुटुंबातील सर्वांकडेच लक्ष द्यायला वेळ न मिळाल्याची जाणीव बायजाला आहे. तिचे कुटुंब म्हणजे तिचा नवरा, तिचा मुलगा आणि शेतात राबराब राबणारी तिची लाल्या–ढवळ्यांची जोडी. बैलांच्या पोळ्याचा सण जवळ आलेला असतांना खिशात दमडीही नसल्याची खंत पैकूच्या मनात असली तरी सणाच्या तयारीसाठी दररोज लाल्या–ढवळ्याच्या तोंडचा थोडासा गवताचा घास हिसकावून बाजारात गवताचा भारा विकून त्याच लाल्या–ढवळ्यांसाठी एकएक पैसा गोळा करणारी बायजा मात्र पोळ्याला पुरणपोळीचा पाहूनचार करण्याच्या पूर्ण तयारीला लागलेली आहे. पोळ्याच्या दिवशी सकाळपासूनच पैकू आणि बायजा आपआपल्या कामाला लागलेले आहेत. बैलांना सायंकाळी तोरणात उभे करावयाचे, यथासांग पूजा झाल्यानंतर अगोदर स्वतःकडे व नंतर ओळखीच्या चार घरी बैलांना फिरवायचे. बैलांच्या कपाळी कुंकवाचा टिळा आणि पायांवर फुले तसेच मालकाच्या हातात पानाचा विडा व अनुकूल द्रव्य अशी वर्षानुवर्षे चालत आलेली परंपरा. परंतु गावातील प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या डॉक्टरांकडे पैकू बैलजोडी घेऊन गेल्यानंतर त्याला आलेला अनुभव मात्र पैकूच्या जिव्हारी लागतो. लाल्या–ढवळ्या हे आज आपल्या घरचे अतिथि असून आणि या देशाची 'अतिथि देवो भव!' ही संस्कृति असतांना डॉक्टरीनबाई मात्र त्यांची पूजा न करता केवळ ओळख म्हणून पैकूच्या हातावर एक रूपयाचा कागदी तुकडा टेकवते हा आपला, आपल्या अतिथिंचा व आपल्या संस्कृतिचा अपमान आहे हे अशिक्षित शेतकरी पैकूला मनोमन पटते पण सुशिक्षित पिढीला केव्हा समजेल अशा संभ्रमात अख्खा एक रूपयांचा कागदी नोट दिव्यावर जाळणारा पैकू आणि त्याची बायको बायजा ही या कथेतील नायक–नायिका वाचकांच्या मनावर छाप पाडल्याशिवाय राहात नाही.

येथे बायजाची भूमिका फार महत्त्वाची व बोलकी आहे. संपूर्ण कथेमध्ये ती वाचकांच्या मनात स्वतः व तिच्या कुटुंबाबद्दल सहानुभूती निर्माण करते. नवऱ्याला सुखदुःखामध्ये साथ देते. मुलामाणसांची आणि लाल्या–ढवळ्या हे प्राणी असूनसुद्धा त्यांची स्वतःच्या मुलांसारखी काळजी घेते. स्वतःचे शेत आणि तिच्या कुटुंबातील या सदस्यांसाठी ती रात्रंदिवस धडपडते. या सर्वांवर ती

Indian Streams Reserach Journal
Vol.1,Issue.X/Nov; 2011

जीवापाड प्रेम करते. त्यांच्यासाठीच ती जराही आराम न करता शेतामध्ये राबते. त्यामुळेच ती पोळ्याचा सण मोठ्या आनंदाने साजरा करते. परंतु लाल्या–ढवळ्यांबद्दल अश्रद्धा दाखविल्यामुळे डॉक्टरीनबाईने त्यांचा पर्यायाने आपलाही अपमान केला असे समजून सोळा आणे किंमतीच्या रूपयाच्या नोटेची आपल्या लाल्या–ढवळ्यांपुढे तिला एक पैशाचीही किंमत वाटली नाही. एवढेच नव्हे तर तो रूपया तिला जहरासारखा वाटतो.म्हणूनच ती दिव्याच्या तेलवातीवर संपूर्ण एक रूपयांची नोट जाळून टाकल्यानंतरच तिचे मन शांत होते. आपल्या पवित्र परंपरा सांभाळणारी ही स्त्री नायिका म्हणून वाचकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यात चोरघडेंनी कौशल्य प्रकट केलेले आहे. एका आदर्श भारतीय स्त्रीच्यारुपाने बायजा चित्रित केलेली आहे.

***'संस्कार'मधील सलमा***

चोरघडे यांच्या अनेक कथानायिकांपैकी 'सलमा' ही एक मुस्लिम कथानायिका खरोखरच मनाला साजेसा आकार देणारी व चांगले संस्कार करणारी अशी कथानायिका आहे. तिचा प्रत्येक शब्द हृदयाचा ठाव घेणारा व तिची संस्कार पद्धती ही विलोभणीय आहे. ही कथा एक प्रकारची लेखकाची आत्मानुभूती वाटते. प्राथमिक शाळेतच त्यांची सलमासोबत प्रथम ओळख झाली. दुर्गुणांचे नामोनिशाण नसलेल्या अनवर पाटलांची ती मुलगी. जशी शरीराने सुंदर तशी मनानेदेखील सुंदर. अगदी छोट्याछोट्या प्रसंगांतून सलमा संस्काराचे मोठमोठे धडे देऊन जाते. 'यशाप्रमाणेच अपयश पचविण्याची शक्तीदेखील माणसांमध्ये असावी हा महत्त्वाचा संदेश सलमाच्या माध्यमातून लेखकाने दिलेला आहे.

'ओली माती कुंभाराच्या चाकावर आकारित होतांना तिला काय वाअत असेल?दगडातून मूर्ती कोरला जात असतांना दगडांना काय वाटत असेल?विलक्षण वेदना! पण असीम आनंदही!' ही सलमाची भूमिका काळजात कालवाकालव निर्माण करणारी आहे. 'साधी बकरीसुद्धा आपल्यापेक्षा शहाणी असते. ती बाभळीची फांदी तोंडात धरून पालवी तेवढी अलगद खाते आणि काटे बाजूला सोडते. तिला एकही काटा बोचत नाही आणि आपण त्या बकऱ्या पोसणारी माणसे मात्र पालवी सोडून काटेच खात बसतो.' चांगल्या गोष्टींचा प्रतिकार करायला माणसाचे मन कधीही तयार नसते. वरवर जरी तो प्रतिकार करीत असला तरी काळजाचा एक कप्पा असा असतो की, त्यामध्ये चांगल्या गोष्टींचादेखील विचार करण्याची शक्ती त्याच्याजवळ असते.म्हणूनच लेखक सलमाचया उपदेशाचा प्रतिकार करू इच्छित नाही. एवढेच नव्हे तर सलमा नेहमीसाठी हृदयात कोरल्याशिवाय राहात नाही.

***आणखी एक कथानायिका 'सखी'***

चोरघडेंच्या अनेक कथानायिकांपैकी एक महत्त्वाची कथानायिका म्हणून 'सखी'कडे पाहिल्या जाते. त्यांच्या मनातील विचारांचे मूर्त स्वरूप 'सखी'मध्ये आलेले आहे. अनेक भावभावनांची गुंफन या कथेमध्ये आलेली आहे. लेखक येथे स्वतः 'एखादी सुंदर मोटारगाडी मनात भरते आणि ती जन्मभर मिळाली नाही तरी आपल्याला विषाद, हायहाय वाटत नाही पण तिच्याबद्दलची आवड, आकर्षण मात्र कमी होत नाही.' हा भाव फार महत्त्वाचा वाटतो पण वस्तू का मिळाली नाही हा विचार मनापासून विचारपूर्वक स्वीकारावा लागतो. तो एकदाचा स्वीकारला की मग कशाबद्दलची खंत मनात उरत नाही.

***कथानायिकेचे स्थान***

'सखी' ही कथा सुरूवातीला गुंतागुंतीची वाटते. ती कधी प्रेमकथाही वाटते. पण जसजसे पुढे जावे तसतसे निर्मळ मैत्रीचे रेशमी धागे गुंफत गेल्याची जाणीव झाल्याशिवाय राहात नाही. या कथेमध्ये अनेक अर्थांनी सौंदर्य फुललेले आहे. येथे सौंदर्याचे संयमी वर्णन आलेले आहे. सौंदर्याप्रमाणेच मर्यादशील वागणेदेखील 'सखी'च्या व्यक्तिमत्त्वात भर टाकणारे आहे.

***निष्कर्ष***

चोरघडे यांनी आपल्या विपुल कथासंसारात अनेक नायिका त्यांच्या नाजूक व वैविध्यपूर्ण भावभावनांसह उत्कृष्ट रीतीने चित्रित केलेल्या आहेत. काही शेतकरी व शेतमजूर स्त्रियांचे प्रतिनिधित्त्व करणाऱ्या, काही परंपरा सांभाळणाऱ्या, काही आपल्या अस्तित्वाची व अस्मितेची जाणीव असणाऱ्या या नायिका कोणत्या ना कोणत्या स्वभावगुणांमुळे मन आकर्षित व विचारप्रवृत्त करणाऱ्या आहेत.

चोरघडेंचे लेखनाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी उत्कृष्ट लोककथाही लिहिल्या. प्रचलित असणाऱ्या पारंपारिक गोष्टींना त्यांनी कथेचे स्वरूप देऊन त्याद्वारे अनायसे फार मोठा संदेश दिला. त्यांची 'सूनबाई'मधील 'मालन' ही कथानायिका मानी व कणखर स्त्री आहे. 'ज्योतिर्मयी' ही नायिका नावाप्रमाणेच तेजस्वी आहे. स्वतःबरोबरच ती इतरांचेदेखील जीवन प्रकाशमान करण्याची अभिलाषा बाळगते. चारित्र्य व शील याला ती जीवनात सर्वात जास्त महत्त्व देते. ती वाचकांना अंतर्मुख करणारी आहे. 'अतिथि देवो भव!'मधील 'बायजा' म्हणजे भारतीय परंपरा निष्ठेने सांभाळणारी एक मध्यमवर्गीय शेतकरी–शेतमजूर कुटुंबाचे प्रतिनिधित्त्व करणारी कथानायिका आहे. मनाने शांत तर कृतीने कणखर असणारी 'बायजा' भारतीय संस्कृतीची पालक आहे. 'संस्कार' कथेतील 'सलमा' ही तिच्या सुशील आणि सुसंस्कृत विचारांनी वाचकांना भारून टाकते. मुस्लिम नायिका म्हणून लेखकाने तिचे रंगविलेले रंगचित्र हे प्रत्येकाला आकर्षित करणारे आहे. माणसांमध्ये पराजय पचविण्याची शक्ती असावी हे तत्त्व ती नकळतच सांगून जाते. चोरघडेंची 'सखी' म्हणजे पवित्र मैत्रीचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. मित्रासोबत घालविलेले दोन क्षण तिला जगण्याची नवीन प्रेरणा देते. एकंदरीत चोरघडेंच्या एकूण कथांमधील पुरूष नायकांपेक्षा स्त्री नायिकांचे स्थान केव्हाही वरचढच आहे.

चोरघडे याची कथालेखनाची इतर कथालेखकांप्रमाणेच स्वतःची अशी अक खास शैली आहे. कथालेखनाविषयी ते एकनिष्ठ व दक्ष आहेत. चोरघडेंच्या कथालेखन काळात वि.स.खांडेकर, ना.सी. फडके, पु.भा.भावे, अरविंद गोखले, गो.रा.दोडके, दिवाकर कृष्ण या कथालेखकांनी कथाक्षेत्रामध्ये स्वतःचे अस्तित्त्व आणि दरारा निर्माण केलेला होता. अशा दमदार कथालेखकांच्या पंगतीला बसण्याचा योग चोघडेंच्या वाट्याला आला तो त्यांच्या प्रतिभा आणि कर्तृत्त्वामुळेच.

वि.स.खांडेकरांची 'जानकी' आणि चोरघडेंची 'बायजा' यांचा तुलनात्मक विचार केला तर असे दिसून येते की, बायजा आपल्या संसाराचा गाडा पैकूच्या बरोबरीने ओढते. जानकी मात्र रघूनाथला फक्त साथ देते. स्वतः काहीतरी करण्याची हिम्मत बायजेमध्ये आहे. पैकू घरी आल्यावर त्याचा उदास चेहरा बघून त्याच्याकडून सत्य वदवून घेते आणि काट्याप्रमाणे सलणारा डॉक्टरीणबाईने दिलेली एक रूपयाची नोट दिव्यावर जाळण्याचा निर्णयदेखील तीच घेते. जानकी मात्र रघुनाथच्या मनातील दुःख जाणू शकत नाही. दुःख फक्त शरीराचेच असते अशी तिची प्रामाणिक कल्पना आहे. रघुनाथचे 'शरीराची जखम कुणालाही दाखविता येते, हृदयाची जखम प्रेम करणाऱ्या माणसाला दिसू शकते, पण माणसाचा रक्तबंबाळ झालेला आत्मा नाही.' हे उद्‌गार दोन लेखकांच्या लेखणातील तफावत दाखविते. अशासारखीच अरविंद गोखले यांची 'कातरवेळ' संग्रहातील 'दुसरी दासी' या कथांमधील 'अक्का' आणि 'माई', व्यंकटेश माडगूळकरांच्या 'माणदेशी माणसं'मधील 'खाला' आणि चोरघडेंच्या 'संस्कार'मधील 'सलमा' या दोन्ही मुस्लिम नायिका असल्यातरी त्यांचा मराठमोळा स्वभाव हा महत्त्वाचा आहे. गंगाधर गाडगीळांच्या कथांमध्ये माणसाविषयीचा जिव्हाळा ओतप्रोत भरलेला आहे. नायिकांचे अंतर्मनाचे विविध नाजूक पापुद्रे अलगद उलगडतांना एकप्रकारचा अनपेक्षितपणा जाणवत राहतो.

Indian Streams Reserach Journal
Vol.1,Issue.X/Nov; 2011

एकूणच समकालीन कथालेखकांच्या कथानायिकांशी चोरघडेंच्या कथानायिकांची तुलना केल्यानंतर त्यातील वेगळेपणा आपल्याला ठळकपणे जाणवतो. रेखीव व्यक्तिचित्रणामुळे कथेतील पात्रे वाचकांसमोर उभे करण्याचे कसब त्यांच्या कथांमध्ये आढळते.

### *संदर्भ साधने ;*

1.म. ना. अदवंत – संपूर्ण चोरघडे.
2.वामन चोरघडे – चोरघडे यांची कथा
3.व्यंकटेश माडगूळकर – माणदेशी माणसं
4.गंगाधर गाडगीळ – काजवा
5.प्रभाकर अत्रे – दीपावली, एप्रिल 1966, आम्ही असे लिहितो. (मुलाखत)
6.मीना मराठे – चोरघडे यांची कथा, 'सत्यकथा'1961,वर्ष 28, अंक 6